# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 24.03.2026** **वार- मंगळवार**

---

**राजमाता जिजाऊ**

एसटी महामंडळाच्या ताफ्यात अत्याधुनिक सुविधांनी सज्ज 'राजमाता जिजाऊ' या बस आजपासून दाखल झाल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत विधानभवनाच्या प्रांगणात या नव्या बस सेवेचं लोकार्पण करण्यात आलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. या नव्या उपक्रमांतर्गत सुमारे 3 हजार बसेस राज्यभरात टप्प्याटप्प्याने दाखल होणार आहेत.

**जनगणना**

आगामी जनगणनेच्या पहिल्या टप्प्याच्या पार्श्वभूमीवर पुण्याच्या निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी दूरस्थ प्रणालीद्वारे जिल्ह्यातील सर्व अधिकाऱ्यांची बैठक घेतली. जनगणना संचालनालयानं पुणे जिल्ह्यासाठी नियुक्त केलेले जिल्हा समन्वयक रजत मित्तल यांनी यावेळी सविस्तर मार्गदर्शन केलं. जनगणनेच्या पहिल्या टप्प्यातील 'घरयादी आणि घरगणना' हे काम येत्या १६ मे ते १४ जून या कालावधीत पार पडणार आहे. त्यापूर्वी १ मे ते १५ मे या कालावधीत नागरिकांना स्व-गणनेची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**मनपा अर्थसंकल्प**

पुणे महापालिकेचा २०२६-२७ वर्षासाठीचा १५ हजार ६६९ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प आज स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी सर्वसाधारण सभेत सादर केला. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सादर केलेल्या १३ हजार ९९५ कोटींच्या प्रारूप अर्थसंकल्पात १ हजार ६७४ कोटींची वाढ करण्यात आली आहे.

या अर्थसंकल्पात "निरोगी पुणे" या संकल्पनेवर विशेष देण्यात आला असून सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, आधुनिक आणि सर्वसामान्यांना परवडणारी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. आरोग्य सेवांसाठी मोठी तरतूद करत विद्यमान सुविधा बळकट करणं आणि नव्या सेवा सुरू करण्याची घोषणा यात करण्यात आली आहे.

नागरिकांना जलद, पारदर्शक आणि परिणामकारक सेवा देण्यासाठी डिजिटल गव्हर्नन्सला प्राधान्य देण्यात आले आहे. महापालिकेत कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तक्रार व्यवस्थापन डॅशबोर्ड विकसित केला जाणार असून सर्व १५ प्रभाग कार्यालयांमध्ये प्रशिक्षित कर्मचारी नियुक्त केले जातील.

"उद्याने – शहराचा श्वास" या संकल्पनेअंतर्गत शहरातील हरित क्षेत्रांचा विस्तार आणि पर्यावरणपूरक प्रकल्पांना चालना देण्यात येणार आहे.

"सशक्त महिला – सक्षम समाज" या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवत महिलांसाठी अनेक महत्त्वपूर्ण योजनाही अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आल्या आहेत. महिलांच्या नावावरच्या ५०० चौरस फुटांपर्यंतच्या घरांना ५० टक्के मिळकत कर सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महिलांच्या उद्योजकतेसाठी स्वतंत्र केंद्र उभारलं जाणार आहे. तसंच महापालिकेच्या ७५ शाळांमध्ये 'पिंक रूम' उभारून किशोरवयीन मुलींसाठी समुपदेशन सुविधा दिली जाणार आहे. महिलांसाठी शहरात १०० आधुनिक सार्वजनिक स्वच्छतागृहांची उभारणी, तसेच स्वसंरक्षण प्रशिक्षण केंद्रांच्या माध्यमातून प्रशिक्षणही देण्यात येणार आहे.

रस्ते, उड्डाणपूल, मेट्रो मार्ग, मिसिंग लिंक, 24 तास समान पाणीपुरवठा योजना, समाविष्ट गावांचा विकास, नदी पुनरुज्जीवन आदी योजनांसाठीही अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्यात आली आहे.

**क्षयरोग मृत्यूदर घट**

जागतिक क्षयरोग निर्मुलन दिन आज पाळला जात आहे. “होय! आपण क्षयरोग संपवू शकतो” ही यंदाची या दिनाची संकल्पना आहे. क्षयरोगावर केल्या जाणाऱ्या उपचारांमध्ये सातत्याने प्रगती होत असून ‘एमडीआर’ आणि ‘एक्सडीआर’ या प्रकारचा क्षयरोगदेखील बरा होत असल्याचं पुणे महापालिकेच्या आकडेवारीवरून दिसून येत आहे. गेल्या काही वर्षांत उपचार पूर्ण करून बरे होणाऱ्या क्षयरुग्णांचं प्रमाण सातत्याने वाढलं आहे. क्षयरुग्णांचं समुपदेशन आणि त्यांना आवश्यक आहार पाकिटे पुरवण्यातही पुणे महापालिका आघाडीवर आहे, असं शहर क्षयरोग अधिकारी डॉ. प्रशांत बोठे यांनी सांगितलं.

**सुशीलकुमार शिंदे डिलीट**

कष्ट आणि सातत्य हीच यशाची आणि प्रगतीची गुरुकिल्ली आहे, असा मंत्र माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी विद्यार्थ्यांना दिला. पुण्यातील सिम्बायोसिस इंटरनॅशनल अभिमत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांना 'डॉक्टर ऑफ लेटर्स' ही मानद पदवी प्रदान करण्यात आली. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यावेळी उपस्थित होते.

**बाजार समिती**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात गेल्या दोन दिवसांपासून गुजराती जांभळांची आवक होत आहे. दरवर्षी एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात सुरू होणारा हंगाम यंदा लवकर सुरू झाला आहे. आता राज्यातील सिंधुदुर्ग, तसंच कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातून जांभळांची आवक होईल. यंदा हंगाम लवकर सुरू झाला असला तरी भाव कायम असल्याचं बाजारपेठेतील अडत्यांनी सांगितलं.

**अतिरिक्त एसटी बस**

आगामी काळात जेजुरी आणि शिखर शिंगणापूर इथं भरणाऱ्या यात्रांच्या पार्श्वभूमीवर एसटीच्या पुणे विभागाने विशेष बस गाड्यांचं नियोजन केलं आहे.

चैत्र पौर्णिमेला जेजुरी, नारायणपूर, आणि निमगाव दावडी इथं तर 27 ते 31 मार्च या कालावधीत शिखर शिंगणापूर इथं यात्रा भरणार आहे. यासाठी हजारो भाविक येत असतात, त्यांच्या सोयीसाठी एसटी महामंडळानं अतिरिक्त बसेसची सोय केली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान ३७ तर किमान तापमान १९ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही तापमानात फारसा बदल संभवत नाही.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**